**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१

मासं/रवका/न.क्र.३४८ /
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६५६ दिनांक ०६ / ०४/ २०२३

**विषय: "औरंगाबाद" नावा ऐवजी "छत्रपती संभाजीनगर" तसेच "उस्मानाबाद" नावा ऐवजी "धाराशिव" असे नावात बदल करण्याबाबत.**

**संदर्भ: १. शासन राजपत्र, सामान्य प्रशासन विभाग दि.२४.०२.२०२३.**
**२. शासन राजपत्र, महसुल व वन विभाग दि.२६.०२.२०२३ (असाधारण क्र.४५ व ४६).**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भिय महाराष्ट्र शासन यांचे राजपत्र, असाधारण भाग एक-मध्य उप-विभाग, असाधारण क्र.२५, सामान्य प्रशासन विभाग दि.२४.०२.२०२३ आणि महाराष्ट्र शासन यांचे राजपत्र असाधारण भाग चार-ब दि.२६.०२.२०२३, महसुल व वन विभाग अधिसूचना दि.२४.०२.२०२३ (असाधारण क्रमांक ४५ व ४६ प्राधिकृत प्रकाशन अन्वये क्रमांक प्राफेब २०२३/प्र.क्र. ३६ व ३७/म-१० महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एक्केचाळीस) चे कलम ४ च्या, पोट कलम (एक) चे खंड (सहा) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा व त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, याद्वारे "औरंगाबाद" विभाग, जिल्हा, उप विभाग, तालुका तसेच गाव व "उस्मानाबाद" जिल्हा, उप विभाग, तालुका तसेच गाव या नावात खालीलप्रमाणे बदल करण्याबाबत सूचना पारित केलेल्या आहेत.

(अ) औरंगाबाद शहराकरीता:-

| (१) | (२) |
|---|---|
| औरंगाबाद विभाग | छत्रपती संभाजीनगर विभाग |
| औरंगाबाद जिल्हा | छत्रपती संभाजीनगर जिल्हा |
| औरंगाबाद उप विभाग | छत्रपती संभाजीनगर उप विभाग |
| औरंगाबाद तालुका | छत्रपती संभाजीनगर तालुका |
| औरंगाबाद गाव | छत्रपती संभाजीनगर गाव |

(ब) उस्मानाबाद शहराकरीता:-

| (१) | (२) |
|---|---|
| उस्मानाबाद जिल्हा | धाराशिव जिल्हा |
| उस्मानाबाद उप विभाग | धाराशिव उप विभाग |
| उस्मानाबाद तालुका | धाराशिव तालुका |
| उस्मानाबाद गाव | धाराशिव गाव |

२. शासन राजपत्र दि.२६.०२.२०२३ रोजी दिलेल्या अधिसूचनांच्या अनुषंगाने सक्षम अधिकारी यांनी म.रा.वि.वि.कं.मर्या.मध्ये सर्व स्तरांवर लेखी व तोंडी उपयोगात असलेल्या "औरंगाबाद" हा जिल्हा, तालुका व गाव याचे नाव शासन अधिसूचनांच्या धर्तीवर "औरंगाबाद" या नावाचा उल्लेख "औरंगाबाद" नावा ऐवजी "छत्रपती संभाजीनगर" तसेच "उस्मानाबाद" नावा ऐवजी "धाराशिव" असा बदल करण्यास मंजूरी प्रदान केलेली आहे.

३. सबब, यापुढे कंपनीतील सर्व स्तरांवर ज्या-ज्या टिकाणी लेखी व तोंडी उपयोगात असलेल्या "औरंगाबाद" या नावा ऐवजी "छत्रपती संभाजीनगर" तसेच "उस्मानाबाद" नावा ऐवजी "धाराशिव" वाचण्यात यावे असे सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून दयावे. तसेच कंपनीच्या संबंधीत कार्यालयांच्या नावात तसा बदल सर्व स्तरावर करण्यात यावा.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**( भूषण कुलकर्णी )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (संचलन)/ (वित्त)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.
३) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
४) कार्यकारी संचालक (मासं)/ (सुवअं)/ (वित्त)/ (महसूल व देयके) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (सांघिक वित्त)/ (अंतर्गत लेखा परिक्षण) / (सांघिक लेखा) /(माहिती तंत्रज्ञान) / मुख्य तपास अधिकारी / मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासं-मासंव्यप्र) /(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक २६] रविवार, फेब्रुवारी २६, २०२३/फाल्गुन ७, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४५**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ फेब्रुवारी २०२३.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.**

क्रमांक प्राफेब २०२३/प्र.क्र. ३६/म-१०.— महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एक्केचाळीस) चे कलम ४ च्या, पोट-कलम (१) चे खंड (सहा) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने जी अधिसूचना काढण्याचे प्रस्तावित केले आहे, त्या अधिसूचनेचा पुढील मसूदा उक्त कलम ४ च्या पोट-कलम (४) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, याद्वारे परिणाम होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे; आणि याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की, उक्त मसूदा महाराष्ट्र शासनाकडून दिनांक २७ मार्च २०२३ रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२. उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना विभागीय आयुक्त, औरंगाबाद महसूल विभाग, दिल्ली गेटजवळ, फाजीलपूरा, औरंगाबाद ४३१ ००१ यांच्याकडे उपरोक्त दिनांकपूर्वी प्राप्त होतील त्या हरकती व सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

**अधिसूचनेचा मसूदा**

क्रमांक प्राफेब २०२३/प्र.क्र. ३६/म-१०.— महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एक्केचाळीस) चे कलम ४ च्या, पोट-कलम (एक) चे खंड (सहा) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा व त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे सोबतच्या अनुसूचीच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या महसुली क्षेत्राच्या नावामध्ये बदल करीत आहे आणि उक्त अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये त्या प्रत्येकासमोर नमूद केल्याप्रमाणे त्यांना नवीन नावे देत आहे.

**अनुसूची**

| (१) | (२) |
| --- | --- |
| औरंगाबाद विभाग | छत्रपती संभाजीनगर विभाग |
| औरंगाबाद जिल्हा | छत्रपती संभाजीनगर जिल्हा |
| औरंगाबाद उप विभाग | छत्रपती संभाजीनगर उप विभाग |
| औरंगाबाद तालुका | छत्रपती संभाजीनगर तालुका |
| औरंगाबाद गाव | छत्रपती संभाजीनगर गाव |

२. कोणताही कायदा किंवा लेख किंवा इतर दस्तऐवज यातील उक्त अनुसूचीच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या महसूली क्षेत्राचा कोणताही संदर्भ हा संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर "उक्त अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये नवीन नावे दिलेल्या महसुली क्षेत्रा" चा संदर्भ असल्याचे समजण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संतोष वि. गावडे,**
शासनाचे उप सचिव.

## REVENUE AND FOREST DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mumbai 400 032, dated the 24th February 2023.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

No. TLC 2023/CR-36/M-10.— The following draft of the notification, which the Government of Maharashtra proposes to issue in exercise of the powers conferred upon it by clause (*vi*) of sub-section (*1*) of section 4, of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966) is hereby published as required by sub-section (*4*) of the said section 4, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 27th day of March, 2023.

2. Any objections or suggestions, which may be received by the Divisional Commissioner, Aurangabad Revenue Division, Near Delhi Gate, Fajilpura, Aurangabad 431 001 from any person with respect to the said draft notification, before the aforesaid date will be considered by the Government.

*DRAFT NOTIFICATION*

No. TLC 2023/CR36/M-10.— In exercise of the powers conferred by clause (*vi*) of sub-section (*1*) of section 4 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966) and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby alters the names of the revenue areas specified in column (*1*) of the Schedule appended hereunder and renames them as mentioned against each of them in column (*2*) of the said Schedule.

*Schedule*

| (1) | (2) |
|---|---|
| Aurangabad Division | Chhatrapati Sambhajinagar Division |
| Aurangabad District | Chhatrapati Sambhajinagar District |
| Aurangabad Sub-Division | Chhatrapati Sambhajinagar Sub-Division |
| Aurangabad Taluka | Chhatrapati Sambhajinagar Taluka |
| Aurangabad Village | Chhatrapati Sambhajinagar Village |

2. Any reference, in any law, instrument or other document, to the revenue areas specified in column (*1*) of the Schedule aforesaid (as they existed immediately before the publication of this notification in the *Official Gazette*) shall, unless the context requires otherwise, be deemed to be a reference the " revenue areas as renamed in column (*2*) of the said Schedule".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANTOSH V. GAWDE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक २६ (२)] रविवार, फेब्रुवारी २६, २०२३/फाल्गुन ७, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४६**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## महसूल व वन विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ फेब्रुवारी २०२३.

### अधिसूचना

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.**

क्रमांक प्राफेब २०२३/प्र.क्र. ३७/म-१०.— महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एक्केचाळीस) चे कलम ४ च्या, पोट-कलम (१) चे खंड (सहा) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने जी अधिसूचना काढण्याचे प्रस्तावित केले आहे, त्या अधिसूचनेचा पुढील मसूदा उक्त कलम ४ च्या पोट-कलम (४) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, याद्वारे परिणाम होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे ; आणि याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की, उक्त मसूदा महाराष्ट्र शासनाकडून दिनांक २७ मार्च २०२३ रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२. उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना विभागीय आयुक्त, औरंगाबाद, महसूल विभाग, दिल्ली गेटजवळ, फाजीलपूरा, औरंगाबाद ४३१ ००१ यांच्याकडे उपरोक्त दिनांकापूर्वी प्राप्त होतील त्या हरकती व सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

### अधिसूचनेचा मसूदा

क्रमांक प्राफेब २०२३/प्र.क्र. ३७/म-१०.— महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एक्केचाळीस) चे कलम ४ च्या, पोट-कलम (एक) चे खंड (सहा) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा व त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे सोबतच्या अनुसूचीच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या महसुली क्षेत्राच्या नावामध्ये बदल करीत आहे आणि उक्त अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये त्या प्रत्येकासमोर नमूद केल्याप्रमाणे त्यांना नवीन नावे देत आहे.



CamScanner

## अनुसूची

| (१) | (२) |
|---|---|
| उस्मानाबाद जिल्हा | धाराशिव जिल्हा |
| उस्मानाबाद उप विभाग | धाराशिव उप विभाग |
| उस्मानाबाद तालुका | धाराशिव तालुका |
| उस्मानाबाद गाव | धाराशिव गाव |

२. कोणताही कायदा किंवा लेख किंवा इतर दस्तऐवज यातील उक्त अनुसूचीच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या महसूली क्षेत्राचा कोणताही संदर्भ हा संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर "उक्त अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये नवीन नावे दिलेल्या महसुली क्षेत्रा" चा संदर्भ असल्याचे समजण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संतोष वि. गावडे,**
शासनाचे उप सचिव.

CamScanner

## REVENUE AND FOREST DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 24th February 2023.

### *NOTIFICATION*

MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

No. TLC 2023/CR-37/M-10.— The following draft of the notification, which the Government of Maharashtra proposes to issue in exercise of the powers conferred upon it by clause (*vi*) of sub-section (*1*) of section 4, of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966) is hereby published as required by sub-section (*4*) of the said section 4, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 27th day of March, 2023.

2. Any objections or suggestions, which may be received by the Divisional Commissioner, Aurangabad Revenue Division, Near Delhi Gate, Fajilpura, Aurangabad 431 001 from any person with respect to the said draft notification, before the aforesaid date will be considered by the Government.

### *DRAFT NOTIFICATION*

No. TLC 2023/CR 37/M-10.— In exercise of the powers conferred by clause (*vi*) of sub-section (*1*) of section 4 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966) and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby alters the names of the revenue areas specified in column (*1*) of the Schedule appended hereunder and renames them as mentioned against each of them in column (*2*) of the said Schedule.

*Schedule*

| (1) | (2) |
|---|---|
| Osmanabad District | Dharashiv District |
| Osmanabad Sub-Division | Dharashiv Sub-Division |
| Osmanabad Taluka | Dharashiv Taluka |
| Osmanabad Village | Dharashiv Village |

2. Any reference, in any law, instrument or other document, to the revenue areas specified in column (*1*) of the Schedule aforesaid (as they existed immediately before the publication of this notification in the *Official Gazette*) shall, unless the context requires otherwise, be deemed to be a reference the revenue areas as renamed in column (*2*) of the said Schedule".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANTOSH V. GAWDE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

CS CamScanner